# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. ६८५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/१०/२०१७

**१) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारहान केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ३०/०९/२०१७ चे १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी दशरथ महादेव वाडीभस्मे वय ६३ वर्ष, रा. मांगली याने आरोपींना 'माझे पत्नीला वेश्या का म्हटले' असे हटकले असता आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरा समोर अंगणात येवुन त्यास अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन हाता बुक्यांनी मारहान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४४७,२९४,३२३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन लोखंडी झाऱ्याने डोक्यावर, हातावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०१/१०/२०१७ चे १९.२० ते २१.११ वाजता दरम्यान यातील फिर्यादी शेषराव प्यारेलाल मडामे वय ३४ वर्ष, रा. जवाहरनगर हा आरोपीचे दुकानात चायनीज खाण्याकरीता गेला व आरोपीने लॉलीपॉपचा आर्डर उशीरा घेतल्याने फिर्यादीने आरोपीस तु माझा आर्डर उ्शीरा का घेतला मी तुला पैसे देत नाही का फुकट खाण्यासाठी आलो का असे बोलला असता आरोपीने फिर्यादी सोबत भांडण, शिवीगाळ करुन चायनीज बनविण्याचे लोखंडी झाऱ्याने डोक्यावर, दोन्ही हातावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन हाताचे बोटाला चावा घेतल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/१०/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी प्रभाकर केशवराव वंजारी रा. सावरी मुरमाडी याने आरोपीस आई श्रीमती कांताबाई सोबत 'भांडण करुन मारण्यास का धावते' असे हटकले असता आरोपीने फिर्यादीचे उजव्या हाताचे बोटाला चावा घेवुन दुखापत केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**४) वाहन सार्वजनीक ठिकाणी थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/१०/२०१७ चे ०८.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन सार्वजनिक रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्या वाहनाना व लोंकाच्या अडथळा तसेच धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. ईगोले पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**५) जळाल्याने महिलेचा औषधोपचारा दरम्यान मृत्यु :–**

दिनांक ०२/१०/२०१७ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. मनिषा ज्ञानेश्वर आरीकर वय ३० वर्ष, रा. नेरला ही दिनांक २०/०९/२०१७ ला अंदाजे १३.३० वा. दर. स्वयंपाक खोलीत गॅसवर चाय बनवीत असतांना अचानक मृतकच्या साडीचा पदर जळत्या गॅस शेगडीवर पडल्याने भडका होवुन ७२ टक्के जळाल्याने तीला औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे वार्ड क्र. १९ मध्ये भरती असतांना उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बोरकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत

**६) अवैध दारू/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक ०२/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन गोबरवाही, लाखणी व पवनी येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून ३५ लिटर हा.भ. दारू+ ६२५ किलो सडवा साहित्य किंमती २३,९५०/–रु, तसेच जुगारातुन ३९०/–रु. असा एकुण किंमती २४,३४०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०२/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७४ केसेस करण्यात आले आहे.

**( मपोउपनी प्रणती लांजेवार)**
**महीती कक्ष अधीकारी भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.